# आंतरराष्ट्रीय परिषद शेगाव, राष्ट्रीय परिषद अमळनेर अध्यक्षपदी प्राचार्य अरविंद चौधरी

(22.11.2019) महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषद आणि गुजरात विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि 29 व 30 नोव्हेंबर 2019 रोजी सेठ जी बी मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय शेगाव येथे आयोजित करण्यात आले असून राज्य वाणिज्य परिषदेचे 31 वे अधिवेशन दि 19 व 20 जानेवारी 2020 रोजी प्रताप महाविद्यालय अमळनेर येथे आयोजित करण्यात आले आहे.शेगाव येथील आंतरराष्ट्रीय व अमळनेर येथील राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष म्हणून कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद चौधरी याची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा राज्य वाणिज्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य बबनराव तायवाडे (नागपूर) कार्याध्यक्ष प्राचार्य टी आर शिवारे (मुबंई) सचिव प्राचार्य जी वाय शितोळे (पुणे) याचे सह राज्य वाणिज्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाने केली आहे. दोघेही परिषदेत प्राचार्य चौधरी हे अध्यक्षीय भाषण करतील

आंतरराष्ट्रीय परिषदेत देशभरातून 200 पेक्षा जास्त संशोधन लेख प्राप्त झालेले असून भूतान येथील डॉ रजनीश बीजभाषण करणार असून सुमारे 400 पेक्षा जास्त वाणिज्य व व्यस्थापन विद्याशाखा तज्ञांच्या उपस्थितीत परिषद होणार आहे प्राचार्य अरविंद चौधरी हे वाणिज्य व व्यस्थापन शाखेतील जेष्ठ अभ्यासक असून त्यांनी विद्यापीठ क्षेत्रात अनेक पदावर तसेच समित्यांवर कार्य केले आहे व आजही राज्यातील अनेक विद्यापिठात ते योगदान देत आहेत. सशोधनक्षेतातही प्राचार्य चौधरी याचे कार्य उल्लेखनीय आहे त्यांनी राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय 56 संशोधन लेख, 10 पुस्तके प्रकाशित केली असून 2 दीर्घ संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत त्याच्या मार्गदर्शनाखाली 10 विद्यार्थ्यांना पीएच डी पदवी प्राप्त झाली आहे. तसेच त्यांनी जापान, न्यूयॉर्क, मेक्सिको, दुबई, बॅकोक येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग दिला आहे.प्राचार्य अरविंद चौधरी यांच्या नियुक्ती बद्दल संस्थेचे चेअरमन मा मिठुलालजी अग्रवाल, व्हा चेअरमन मा अजयजी जैन, सचिव मा विकासजी कोटेचा व सर्व सचालक यांचेसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी **अभिनंदन** केले आहे



लोकशाही

6/6

## आंतरराष्ट्रीय परिषद शेगाव अध्यक्षपदी प्राचार्य अरविंद चौधरी

बोदवड प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषद आणि गुजरात विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि २९ व ३० नोव्हेंबर २०१९ रोजी सेठ जी.बी.मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय शेगाव येथे आयोजित करण्यात आले असून राज्य वाणिज्य परिषदेचे ३१ वे अधिवेशन दि १९ व २० जानेवारी २०२० रोजी प्रताप महाविद्यालय अमळनेर येथे आयोजित करण्यात आले आहे.

शेगाव येथील आंतरराष्ट्रीय व अमळनेर येथील राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष म्हणून बोदवड येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी याची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा राज्य वाणिज्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य बबनराव तायवाडे (नागपूर) कार्याध्यक्ष प्राचार्य टी.आर.शिवारे (मुबंई)सचिव,प्राचार्य जी.वाय. शितोळे (पुणे) याचे सह राज्य वाणिज्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाने केली आहे.दोघेही परिषदेत प्राचार्य चौधरी हे अध्यक्षीय भाषण करतील

आंतरराष्ट्रीय परिषदेत देशभरातून २०० पेक्षा जास्त संशोधन लेख प्राप्त झालेले असून भूतान येथील डॉ.रजनिश बीजभाषण (पान २ वर)



तरुण भारत

Main Edition | 2019-11-18 | Page- 7

ईस चेअरमनपदी गौतम रण्यात आली आहे. त्यांच्या निवडीनंतर संचालक मंडळाकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.

## शेगाव, अमळनेर येथील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या अध्यक्षपदी प्राचार्य अरविंद चौधरी

तभा वृत्तसेवा

बोदवड, १७ नोव्हेंबर

महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषद आणि गुजरात विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन २९ व ३० नोव्हेंबर रोजी सेठ जी.बी.मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय शेगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. शेगाव येथील आंतरराष्ट्रीय व अमळनेर येथील राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष म्हणून कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली.

राज्य वाणिज्य परिषदेचे ३१ वे अधिवेशन १९ व २० जानेवारी २०२० रोजी प्रताप महाविद्यालय अमळनेर येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी राज्य वाणिज्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य बबनराव तायवाडे (नागपूर) कार्याध्यक्ष प्राचार्य टी आर शिवारे (मुबंई) सचिव प्राचार्य जी वाय शितोळे (पुणे) याचेसह राज्य वाणिज्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाने त्यांच्या निवडीची घोषणा केली. दोघेही परिषदेत प्राचार्य चौधरी हे अध्यक्षीय भाषण करणार आहेत.

आंतरराष्ट्रीय परिषदेत देशभरातून २०० पेक्षा जास्त संशोधन लेख प्राप्त झालेले असून भूतान येथील डॉ रजनीश बीजभाषण करणार असून सुमारे ४०० पेक्षा जास्त वाणिज्य व व्यस्थापन विद्याशाखा तज्ञांच्या उपस्थितीत परिषद होणार आहे. प्राचार्य अरविद चौधरी हे वाणिज्य व व्यस्थापन शाखेतील जेष्ठ अभ्यासक असून त्यांनी विद्यापीठ क्षेत्रात अनेक पदावर तसेच समित्यांवर कार्य केले आहे. त्यांनी राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय ५६ संशोधन लेख, १० पुस्तके प्रकाशित केली आहेत. तसेच त्यांनी जापान, न्यूयॉर्क, मेक्सिको, दुबई, बँकॉक येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग दिला आहे. प्राचार्य अरविंद चौधरी यांच्या नियुक्ती बद्दल संस्थेचे चेअरमन मिठुलालजी अग्रवाल, व्हा.चेअरमन अजय जैन, सचिव विकास कोटेचा यांनी अभिनंदन केले आहे.

Powered by Bharati Web Pvt Ltd